
वृषाली जोगळेकर
vrushali.joglekar@uniquefeatures.in

# सीएडॅशबोर्ड सीए फर्मसाठी नो टेन्शन



**खरं तर त्या तिघांचं सगळं उत्तम चाललं होतं. टीसीएससारख्या नामांकित कंपनीत भरपूर पगाराची नोकरी, कामानिमित्ताने अधूनमधून परदेशवाऱ्या, एकूणात करिअरच्या एक्स्प्रेस वेवर त्यांचा प्रवास तसा आरामात चालू होता. असा प्रवास करणारे सहसा आपला मार्ग बदलत नाहीत, याच रस्त्यावर कमीअधिक गतीने वाटचाल चालू राहते. हा कम्फर्ट झोन त्यांना हवाहवासा वाटतो. पण त्या तिघांनी हा कम्फर्ट झोन सोडून बाहेर यायचं ठरवलं, नवीन मार्ग चोखाळायचा ठरवला. त्यांनी एक नवा उद्योग सुरु केला. असा उद्योग की ज्यामुळे अनेक छोट्यामोठ्या उद्योजकांना, सीए आणि सीएस मंडळींना मोठाच दिलासा मिळाला. कोण आहेत हे तिघं ? त्यांनी कोणता मार्ग शोधला ?**

सतीश बोरा, सुनील बोडके आणि सचिन निरवणे हे तिघंजण टीसीएस या नावाजलेल्या आयटी कंपनीमध्ये उच्च पदांवर काम करत होते. पण स्वत:चा काहीतरी उद्योग सुरु करायचाच हे मात्र त्यांनी आधीपासूनच ठरवलेलं होतं. काही वर्षं नोकरीमध्ये कामाचा अनुभव घेतल्यानंतर त्यांनी नोकरीला बायबाय केलं आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटचा व्यवसाय सुरु केला. 'माइंडचीप्स' नावाची कंपनी त्यांनी त्यासाठी सुरु केली. प्रत्येक उद्योजकाला सुरुवातीच्या काळात येणाऱ्या अनेक अडचणींचा सामना या तिघांनाही करावा लागला. पण पुढे जाऊन या अडचणींनीच त्यांना एक नवी वाट दाखवली.

उद्योग-व्यवसाय कोणताही असला आणि तो लहानमोठा कसाही असला तरी प्रत्येक उद्योजकाला अनेक सरकारी कागदपत्रांची (परवाने, मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र वगैरे), वेगवेगळ्या करांची, निरनिराळ्या शुल्कांची पूर्तता ही अनिवार्य असते. मुळात व्यवसाय सुरु केल्याची सरकार दरबारी नोंद असणे आवश्यक असते. व्यवसाय करण्याचा परवाना, शॉप अॅक्ट लायसन्स आणि तत्सम कागदपत्रांची पूर्तता, वेळोवेळी नूतनीकरण या गोष्टी अपरिहार्य असतात. त्याशिवाय सर्व्हिस टॅक्स, एक्साइज ड्यूटी, इनकम टॅक्स, प्रॉपर्टी टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स आणि असे कितीतरी टॅक्स सरकारने ठरवून दिलेल्या प्रमाणात आणि वेळेत भरायचे असतात. शिवाय निरनिराळ्या वित्तसंस्था किंवा बँकांचे हप्ते असतात. हे सगळं चक्र संपूर्ण वर्षभर चालूच राहतं.

या सगळ्या कामासाठी एकतर वेगळी व्यक्ती नेमावी लागते किंवा मग अकांउंट्स सांभाळणारी व्यक्ती ती जबाबदारी घेते. प्रत्येक उद्योगाचा अकांउंट्स विभाग या सर्व पूर्तता करण्याचं काम वेळोवेळी करत असतो. पण त्याचं नियमन आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी मात्र ऑडिटरवर म्हणजे त्या उद्योगाच्या सीएवरच असते. काम कोणीही केलं तरी ते वेळेत झालं आहे का नाही, सरकारला अपेक्षित असणाऱ्या स्वरुपात झालं की नाही ते पहावं लागतं. कारण त्यात काही गडबड झाली, वेळेत पूर्तता नाही झाली तर बरेच अडथळे निर्माण होऊ शकतात. त्याचा दंड सोसावा लागतो. थोडक्यात, या सगळ्या पूर्तता हा उद्योग व्यवसायातला कीचकट आणि वेळखाऊ वाटला तरी एक महत्त्वाचा आणि अपरिहार्य भाग आहे.

एक काळ असा होता की सीएच्या फर्मचं काम मर्यादित होतं. त्यामध्ये संबंधित उद्योगाच्या अकांउंट्स विभागानं हिशेब व्यवस्थित ठेवले आहेत की नाहीत ते पाहणं, बॅलन्स शीट फायनल करणं आणि इन्कम टॅक्सचं कॅलक्युलेशन करुन तो वेळेत भरला जाईल असं पाहणं एवढीच जबाबदारी मुख्यत: होती. त्याशिवाय काही सरकारी परवाने लागत असत किंवा काही पूर्तताही करायच्या असत, पण त्यांचं प्रमाण फारसं नव्हतं. पण गेल्या काही वर्षांत मात्र हे चित्र झपाट्याने बदललं. सरकारी पूर्ततांची संख्या आणि प्रमाण वेगानं वाढत गेलं. त्यामुळे चार्टर्ड अकांउंटंट्सच्या फर्मच्या कामाची व्याप्ती वाढत गेली. याच टप्प्यावर इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे याही क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढू लागला.

आपण वर पाहिलेल्या सगळ्या सरकारी पूर्तता पूर्वी हाताने केल्या जायच्या. त्यासाठी लागणारे निरनिराळे अर्ज, त्यावरचे आकडे,करांची टक्केवारी हे सगळं हाताने करताना चुका होण्याची शक्यता बरीच असायची. शिवाय या सगळ्याच्या खूप फाईली तयार व्हायच्या. त्या सांभाळणं हे जिकीरीचं काम असायचं. शिवाय पुढे काही दिवसांनी संदर्भासाठी त्यातला एखादा विशिष्ट कागद शोधणं हे त्रासदायक असायचं. नंतर कॉम्प्युटर आले. हळूहळू कॉम्प्युटरवर हे रेकॉर्ड ठेवण्याचं काम सुरु झालं. त्यासाठी पारंपरिक पद्धतीचं नोटबुक रजिस्टर किंवा








सीएडॅशबोर्डची टीम



सीएडॅशबोर्ड कसं काम करतं याचं प्रात्यक्षिक

एक्सेलशीट वापरलं जायला लागलं. या दोन्ही प्रकारांमध्ये त्यांच्या त्यांच्या मर्यादा आहेत. सीएकडे काम करणाऱ्या ट्रेनी व्यक्ती (म्हणजे सीए शिकत असलेल्या किंवा कॉमर्स पदवीधारक) हे काम करतात. स्वत: सीए या रेकॉर्डच्या आधारे त्याचं लेखापरीक्षण म्हणजेच ऑडिट करतो. त्यासाठी हे रेकॉर्ड जबाबदारीने केलेले आणि बिनचूक असणे गरजेचे असते. कोणत्याही क्लाएंटचं असं परिपूर्ण रेकॉर्ड सीएला एका क्लीकवर बघता आलं तर ते खूपच सोयीचं होईल. शिवाय उद्योजकालादेखील आपलं हे काम किती झालेलं आहे, किती बाकी आहे याची माहिती एका क्लीकवर मिळाली तर व्यवसायिक अंदाज बांधणं, काही तरतूद करणं या दृष्टीनं सोयीस्कर होईल. सीएडॅशबोर्ड नेमकं हेच करतं. ते वापरायला सुटसुटीत तर आहेच पण सरकारी कागदपत्रांची करावी लागणारी पूर्तता या कीचकट गोष्टीपासून सीए मंडळींना आणि उद्योजकाला मोठाच दिलासा देणारं आहे. शिवाय प्रत्येक पूर्ततेसाठी आगावू सूचना मिळत असल्यामुळे सगळ्या पूर्तता वेळेत होतात, दंड, विलंबशूल्क भरावं लागत नाही.

या तिघा मंडळींना याची कल्पना सुचली कशी? नोकऱ्या सोडून त्यांनी सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटचा उद्योग सुरु केला. पण सगळ्या उद्योजकांप्रमाणेच त्यांनाही या सरकारी पूर्ततेच्या अडथळ्यांना पार करावं लागत होतंच. त्यांनी त्यासाठी तज्ञ सीएची नेमणूकही केली आणि सीएकडून त्यांचं काम सुरळीत होतही होतं. पण सीए बरोबर बोलताना त्यांना हे जाणवलं की यात बऱ्याच अडचणी आहेत. म्हणजे कोणत्या पूर्तता झाल्या आहेत, कोणत्या बाकी आहेत हे विचारलं तर चटकन ते मिळायचं नाही. मग त्यांच्या ट्रेनीने ते काम केलेलं असायचं, त्याच्याशी बोलावं लागायचं. दोन तीन वेळा असं झाल्यावर मग या तिघांना असं वाटलं की एका दृष्टीक्षेपात सगळं स्टेटस कळलं पाहिजे अशी काहीतरी व्यवस्था असायला हवी. सुदैवाने याच काळात सरकारने देखील या सगळ्या पूर्तता करण्यासाठी ऑनलाईन व्यवस्था सुरु केली. मग आय.टी.चा प्लॅटफॉर्म वापरुन यासाठी एखादं सॉफ्टवेअर बनवावं असं या तिघांनी ठरवलं आणि त्यादृष्टीनं ते प्रयोग करायला लागले.

मुळात सीए मंडळींचं काम चालतं कसं हे त्यांनी अभ्यासलं. एका सीएकडे किमान शंभर क्लाएंट्स तरी नक्कीच असतात. शंभर क्लाएंट्ना सेवा देणं एकट्या व्यक्तीला शक्य नसतं. त्यामुळे त्यांच्याकडे स्टाफ नेमावा लागतो. हा स्टाफ शिकाऊ असल्याने त्यांच्याकडून चुका होण्याची शक्यता बरीच असते. त्यामुळे काही गोंधळ होण्याची शक्यता असते. सीए लोकांना आपल्या क्लाएंटचं स्टेटस काय आहे हे ऑफिसमध्ये असताना समजायचं, पण बाहेर असताना अचानक ते लागलं तर मात्र ते मेलवर, फोनवर कळायचं आणि बऱ्याचदा ते पूर्णपणे समजायचं नाही. यावर उपाय मिळाला तर बरंच होईल असं सीए मंडळींनादेखील वाटत होतं. म्हणजे ऑफिसमध्ये चालणारं इनहाऊस काम सुरळीत झालं पाहिजे, सीएला तो कुठेही असला तरी कोणत्याही क्लाएंटचं अपडेटेड स्टेटस कळलं पाहिजे असं वाटत होतं आणि त्याचवेळी क्लाएंटलादेखील आपले कोणत्या सरकारी पूर्तता पूर्ण झाल्या आहेत, कोणत्या बाकी आहेत हे चटकन समजलं पाहिजे अशी क्लाएंटची इच्छा होती. या सगळ्यांच्याच अडचणी दूर करणारं, उपयोगी पडणारं सॉफ्टवेअर तयार झालं पाहिजे. २०१३ साली ते तयार झालं, 'सीएडॅशबोर्ड'.

सीएडॅशबोर्डसाठी कोणत्याही वेगळ्या हार्डवेअर अथवा सॉफ्टवेअरची आवश्यकता नसते. फी भरुन त्याचं सभासदत्व घेता येतं. ते घेतलं की आपल्याला त्याचा लॉग इन आय डी आणि पासवर्ड दिला जातो. आपल्या क्लाएंटच्या कामाचं स्वरुप, त्याच्या व्यवसायाची व्याप्ती या सगळ्याचा विचार

करुन क्लाएंटकडील कोणाकोणाला सीएडॅशबोर्डचा ॲक्सेस द्यायचा हे सीए ठरवतात. वापरायला अतिशय सोपं असल्याने त्याला वेगळ्या प्रशिक्षणाची फारशी गरज भासत नाही. पण आवश्यकता असेल तर माइंडचीप्सने ती सोयदेखील उपलब्ध केलेली आहे.

'क्लाऊड' या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर असलेलं सीएडॅशबोर्ड अमेझॉन या जगप्रसिद्ध क्लाऊड होस्टिंगकडे होस्ट केलेलं आहे. त्यामुळे यातली सुरक्षितता, गुप्तता आटोकाट पाळली जाते. ठरलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त कोणालाही सीएडॅशबोर्डला कनेक्ट होता येत नाही. क्लाऊड तंत्रज्ञानामुळे कोणत्याही ठिकाणी बसून सीएडॅशबोर्डला कनेक्ट करणं शक्य आहे. त्यामुळे प्रवासात, घरी कुठेही संदर्भ लागला तर सीएडॅशबोर्ड तो लगेचच पुरवतो. निरनिराळ्या ४५० सरकारी कामांची पूर्तता करायची सोय सीए डॅशबोर्डवर सध्या आहे. एकाचवेळी आपल्या सगळ्या क्लाएंट्सचं स्टेटस चेक करणं यामुळे सीए मंडळींना सहजशक्य झालं आहे. उद्योजकालादेखील हे खूपच सोयीचं झालं आहे. सीए मंडळींशी आणि उद्योजकांशी बोलून, त्यांच्या अडचणी समजून घेऊन वेळोवेळी हे सॉफ्टवेअर अपग्रेड केलं जात आहे.

सीएडॅशबोर्डमुळे सरकारी पूर्तता ऑन लाईन करणं सहजशक्य झालं आहे. त्यामुळे त्यात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्याही ताबडतोब कळतात. शिवाय सीए डॅशबोर्डवर उपलब्ध नसलेली एखादी सरकारी पूर्तता एखाद्या उद्योजकाला करायची असेल तर तो ती त्यात नोंदवू शकतो. तसंच सगळ्याच उद्योजकांना सगळ्याच पूर्तता अनिवार्य नसतात. त्यामुळे आपल्या उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक तेवढ्याच पूर्ततांसाठी तो सीएडॅशबोर्ड वापरु शकतो. एखादा हप्ता किंवा शूल्क ज्या कालावधीत भरायचे असेल, त्याच्या काही दिवस आधीपासून सीएडॅशबोर्ड त्याची आठवण करुन द्यायला लागतो. म्हणजे आपलं लक्षात ठेवण्याचं कामसुद्धा सीएडॅशबोर्ड करतो. शिवाय आठ वर्षांचं रेकॉर्ड सीएडॅशबोर्डवर जतन करता येतं. कामाच्या आवश्यकतेनुसार सीए किती वर्षांचं रेकॉर्ड जतन करायचं ते ठरवतो. त्यामुळे कोणताही जुना संदर्भ लागला तरी तो चटकन मिळतो.

इतकं उपयुक्त सॉफ्टवेअर असलं तरीसुद्धा सुरुवातीला त्याची उपयुक्तता लोकांना पटवून देणं या तिघांना अवघड गेलं. मग त्यांनी त्यांच्या स्वतःच्या सीएपासूनच सुरुवात केली. मग आणखी काही ओळखीच्या सीए लोकांना ते पटवून दिलं. आपल्या सॉफ्टवेअरची मागणी वाढवण्याच्या दृष्टीकोनातून काय करता येईल हे आजमावण्याच्या दृष्टीने श्री. सतीश बोरा यांनी दे आसराच्या टीमशी संपर्क केला. दे आसराची टीम व माइंडचीप्सची टीम यांच्यात या विषयावर खुलासेवार चर्चा झाली. मार्केटिंगची टीम वाढवण्यासाठी बरीच गुंतवणूक करावी लागेल असं माइंडचीप्सच्या टीमला वाटत होतं. दे आसरामधील तज्ज्ञ मंडळींनी त्यांना दाखवले की गुंतवणुकीचे प्रमाण खूप कमी करुनही मार्केटिंगचे काम पुढे नेता येईल. माइंडचीप्सची टीम आपल्या व्यवसायातील नफा कंपनीच्या व्यवसायवाढीसाठी वापरुन कंपनी प्रगतीपथावर नेत आहे. काहीच दिवसात त्याचा इतका बोलबाला झाला की सीएडॅशबोर्डचा प्रसार सगळीकडे होत गेला. भारतभरातल्या आणि आशिया खंडातल्या इतरही अनेक देशातल्या सीएंच्या अनेक फर्म्स सीएडॅशबोर्डशिवाय आता काम करत नाहीत. एक लाखाहून अधिक उद्योजक आजमितीला सीएडॅशबोर्डला जोडले गेले आहेत.

आय.टी. मधलं झगमगीत करिअर असलेली अनेक मंडळी आज भारतात आहेत. पण मऊशार हिरवळीवरचा हा रस्ता सोडून काहीसा खडतर वाटणारा उद्योजकतेचा मार्ग स्विकारणारे हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकेच आहेत. भारतीय उद्योग, शेती, शिक्षण, आरोग्य, जीवनशैली, इथले सामाजिक प्रश्न यावर अधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उपाय, तोडगे काढण्याचा विचार या मंडळींनी केला तर सीएडॅशबोर्डसारख्या अनेक उद्योगांची निर्मिती होऊ शकते आणि अनेक समस्यांसाठी उपाय निघू शकतात. कोणत्याही कामातली क्लीष्टता कमी होणं, ते सोपं होणं, त्यातला वेळ वाचणं, पैसे वाचणं, त्यातली सुरक्षितता जपली जाणं अशा अनेक गोष्टी सर्वसामान्य माणसांसाठी आणि उद्योजकांसाठी महत्त्वाच्या असतात. यासाठी नवीन तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान प्रभावीपणे कसं वापरता येईल याचा विचार व्हायला हवा. सतीश बोरा, सुनील बोडके आणि सचिन निरवणे या तिघांनी असा विचार केला आणि सीएडॅशबोर्ड हे अत्यंत उपयुक्त सॉफ्टवेअर तयार झालं. यशस्वी उद्योजकच्या टीमकडून आणि वाचकांकडून या तिघांनाही सदिच्छा. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन असे अनेक उद्योजक तयार व्हावेत ही अपेक्षा आता आपण नक्कीच करु शकतो. ◆

संपर्क : www.cadashboard.com